भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ BV 893486

अनु.क्र. 158712 दि. 28 FEB 2023 मु.शु.रक्कम रु. 500

दस्ताचा प्रकार:- हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव शाफिक म...(पठाण)

पत्ता बालेवाडी, पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव पी. एम. आर. डी. ए

हस्ते व्यक्तीचे नांव- अभिनव...  पत्ता- ....

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

संजय रंगनाथ चौधरी
परवाना क्र. २२०१११४
१८४, कसबा पेठ, पुणे-११.

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासुन ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

वरिष्ठ कोषागार अधिकारी
पुणे

22 FEB 2023

प्रथम मुद्रांक लिपीक
कोषागार पुणे करिता

NOTARY
MRS. UJWALA A. MATE
PUNE
REGD. NO. 6330
EXP. DT. 16/07/2023
GOVERNMENT OF INDIA

हमीपत्र

भारत INDIA 5 रु. FIVE RUPEES NOTARIAL

NOTARIAL

NOTARIAL

NOTARIAL

NOTARIAL

UJWALA A. MATE

**हमीपत्र**

हमीपत्र आज दिनांक / /२०२३ इसवी ते दिवशी, आम्ही, **१) श्री. शफिक सत्तार पठाण,** वय - २९ वर्षे, धंदा – व्यापार, **२) श्री. अंकूश बाळू भिसे,** वय - ३७, धंदा – व्यापार, **३) सौ. अचलाराणी छोटेलाल गुप्ता,** वय - २८ वर्षे, धंदा – व्यापार, सर्व रा. बालेवाडी, पुणे - ४११०४६, व **४) श्री. मुकेश कुमार पांडेय,** वय - ३७ वर्षे, धंदा – व्यापार, पत्ता. हाऊस नं. ३२, मु.सिकरहा, पो.अतरौरा, ता. हंडीया, जि. इलाहाबाद, उत्तर प्रदेश - २२१५०२, कारणे हमीपत्र लिहून देतो की,

१) मौजे **नांदे,** ता. मुळशी, जि. पुणे येथील **सर्व्हे नं. १३/२,** यापैकी हमीपत्र **लिहुन देणार नं. १ यांचे क्षेत्र १८६ चौ.मी., लिहुन देणार नं. २ यांचे क्षेत्र १८६ चौ.मी., लिहुन देणार नं. ३ यांचे क्षेत्र ९३ चौ.मी., व लिहुन देणार नं. ४ यांचे क्षेत्र ९३ चौ.मी., असे एकुण क्षेत्र ५५८ चौ.मी.,** या मिळकतीमधील निवासी/बिगरनिवासी पद्धतीचा प्लॉट बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक/कुलमुखत्यारधारक म्हणून मी/आम्ही दाखल केला आहे. तुर्त या जागी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे/ग्रामपंचायतकडून पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती देण्यात आली असून याला पर्याय म्हणून बोरव्द्वारे पाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टँकरव्द्वारे पाणी मिळवण्याची व्यवस्था करीत आहे. त्यासाठी आवश्यक त्या वरिष्ठ अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S & D. A.) या कार्यालयामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देण्याची जबाबदारी आमचेवर बंधनकारक राहिल.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी/अगर बिगरनिवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेश्यादाबाने करू शकत नसल्यास, पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतीमधील रहिवाश्यांना मी/आम्ही करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी/आम्ही या हमीपत्राव्द्वारे स्विकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरू न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी/आम्ही कोर्टाकडे दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळयाचे विक्रीचे बुकींग करताना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठयाची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करण्याची जबाबदारी राहील. जागे वरील परीस्थितीची जाणीव करून दिल्यानंतर या ठिकाणी होणाऱ्या बुकिंगनंतर नियोजित गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झालातर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे / ग्रामपंचायतचा पाणी पुरवठा सुरू होईपर्यंत आमच्या खर्चाने पाणी पुरवठा करून देण्याची जबाबदारी आमची राहील. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे/ग्रामपंचायतला तोशिष लागू देणार नाही.

५) टँकरव्द्वारा किंवा बोरव्द्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने प्रयोगशाळेतुन तपासुन आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल याची काळजी मी/आम्ही घेऊ.

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक/मालक या नात्याने मी/आम्ही अन्य भविष्य काळात विकल्यास नविन मालक/प्रवर्तक या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्यांचा समावेश नविन करारनाम्यात येईल याची काळजी घेईन/घेवू.

७) हे हमीपत्र माझे/आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉटसंदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

ठिकाण: पुणे

दिनांक : / /२०२३

१) श्री. शफिक सत्तार पठाण

२) श्री. अंकूश बाळू भिसे

३) सौ. अचलाराणी छोटेलाल गुप्ता

४) श्री. मुकेश कुमार पांडेय
हमीपत्र देणार

NOTARY GOVERNMENT OF INDIA
MRS. UJWALA A. MATE
PUNE
REGD. NO. 6330
EXP. DT. 16/07/2023

BEFORE ME

MRS. UJWALA A. MATE
NOTARY, GOVT. OF INDIA
PASHAN, PUNE - 21
PUNE DISTRICT

NOTED AND REGISTERED AT
SERIAL. NO. 2271/2023

6 APR 2023